## नि.दि.दा.क्र.११३/२०२२, निशाणी ०१ खालील आदेश
(CNR MHSI080009642022)

०१. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १ व २ यांना पंजीकृत डाकेने दावा समन्स निर्गमित करण्यात आले होते. त्याबाबत प्रतिवादी क्र.१ व २ यांना दावा समन्स प्राप्त झालेबाबतच्या पोहोच पावत्या नि.क्र. ५५ व ५६ प्रमाणे आहेत. प्रतिवादी क्र.१ चंद्रभागा व प्रतिवादी क्र.२ अनंत यांच्या पोहोच पावत्या नि.क्र. ५५ व ५६ या न्यायालयास अनुक्रमे दि.१४/७/२०२३ व २४/७/२०२३ रोजी प्राप्त झालेल्या अाहेत. त्यामुळे, निश्चितच प्रतिवादी क्र.१ यांना दि.१४/७/२३ व प्रतिवादी क्र.२ यांना दि.२४/७/२३ पुर्वी दावा समन्स प्राप्त झालेले आहेत. अशा परीस्थितीत कायद्याने निर्धारीत केलेल्या कालावधी दरम्यान प्रतिवादी क्र. १ व २ यांनी आपली कैफियत दाखल केलेली नाही.

०२. प्रतिवादी क्र.८ व १० हे दि.२७/०६/२०२३ रोजी हजर झाले आहेत. परंतू, त्यांनी सुध्दा विधिसिमीत कालमर्यादेअंतर्गत आपली कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादी क्र.६ यांना समन्स प्राप्त होऊनही त्या गैरहजर आहेत. सबब, प्रतिवादी क्र. १, २, ८ व १० यांचे विरुध्द प्रस्तूत प्रकरण त्यांचे विरुध्द विना कैफियत व प्रतिवादी क्र.६ यांचेविरुध्द एकतर्फा चालवण्यात येत आहे.

सही/-

दिनांक – १३/१२/२०२३

(टी.एच.शेख)
न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय
वैभववाडी